# “आदिवासी महिला सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटांची भूमिका”

आंबरे किरण दामोदर, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. मो. नं ९८२२७०९०३१

........................................................................................................................................

**सारांश:—**प्रस्तुत लेख आदिवासी महिलांच्या सबलीकरणासाठी केल्या जाणा—या उपाय योजनांवर प्रकाश टाकणारा आहे. शासनाच्या आदिवासी विकास विभागाने आदिवासी महिलांच्या सबलीकरणासाठी आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गट नावाची योजना सुरु केली आहे. साधारणपणे संपुर्ण भारतभर आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गट निर्माण करण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने या लेखामध्ये आदिवासी महिलांचे वास्तव जीवन, आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गट योजनेचे स्वरुप व या योजनेद्वारे आदिवासी महिला सबलीकरणासाठी केली जाणारी कार्ये याबाबत आढावा घेण्यात आलेला आहे. या योजनेद्वारे आदिवासी महिलांना रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. त्यासाठी वेगवेगळया घरगुती स्वरुपाच्या लघुउद्योग व्यवसायासाठी (उदा. दुग्ध व्यवसाय, शेळी—मेंढीपालन, कुक्कुटपालन इ.) या महिला बचत गटांना भांडवल उपलब्ध करुन दिले जाते. ज्यातून आदिवासी महिला स्वावलंबी बनतील आणि त्यामुळे त्या स्वत:बरोबरच आपले कुटूंब, आपला समाज परिसर यांच्या विकासासाठी एकत्र येऊन प्रयत्न करतील. अशा प्रकारे आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गटांची आदिवासी महिलांच्या सबलीकरणातील भूमिका महत्वाची ठरते आहे.

**प्रास्ताविक:—**भारतीय समाजातील महीलांचे प्रश्न जगातील इतर महीलांपेक्षा मुलत: निराळे आहेत. अगदी प्राचीन काळात स्त्रियांना स्वातंत्र्य होते. त्यांना विकासाच्या सर्व संधी उपलब्ध होत्या. कुटुंबात आणि समाजात त्यांना स्थान होते. स्वत:च्या जीवनासंबंधीचा निर्णय घेण्याचा अधिकारही होता, असे प्राचीन भारतातील अनेक विदुषींचे उल्लेख आढळतात.मध्ययुगात मात्र परिस्थिती विपरित झाली. त्यापुर्वी स्मृतीकाळातच एकीकडे स्त्रियांना पूजनिय मानले जात होते, तर दुसरीकडे त्यांना स्वातंत्र्य देऊ नये, अशा आशयाचे उल्लेखही आहेत. मध्ययुगात तर परिस्थिती अधिकच वाईट बनत गेली. परकीय आक्रमकांच्या टोळधाडी प्रारंभी केवळ संपत्तीची लूट नेत असल्यातरी नंतरच्या काळात मात्र त्यांची वक्रदृष्टी येथील संपत्तीबरोबरच स्त्रियांकडेही वळली. स्त्रिया हया पळविल्या जाऊ लागल्या. ‘स्त्रीधन’ ही कल्पना रुढ झाली. त्यामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अतिक्रमण होऊ लागले. परिणामी स्त्रीयांना आपले जीवन ‘चूल आणि मूल’ एवढया कार्यक्षेत्रापुरतेच मर्यादित करावे लागले. पारंपारिक सामाजिक आणि गावच्या सामूहिक जीवनातूनही त्यांना विलग व्हावे लागले. आणि परंपरेने चालत आलेल्या कौटुंबिक विधी—उत्सवांपुरतेच तीचे कार्यक्षेत्र मर्यादित बनले.भारतीय आदिवासी स्त्री—जीवन सामान्य भारतीय ग्रामीण व नागरी स्त्री—जीवनापेक्षा निश्चितच आगळे—वेगळे आहे. मध्ययुगातील परकीय आक्रमकांची दृष्टी त्यांच्यापर्यंत पोहचू शकली नाही. म्हणून आदिवासी स्त्रीयांवर मात्र वाईट स्थिती ओढावली नाही. त्यांचे स्वत:च्या जमातीतील स्थान मात्र कायम आबाधित राहिले. स्वातंत्र्य टिकून राहिले. स्त्रीया या आदिवासी समाजाच्या अर्धा भाग आहेत. आदिवासी स्त्री नवऱ्याला देव मानत नाही. ही मुल्ये नाहीत, देव मानून किंवा धनाच्या लोभाने सर्व छळ सहन करावा अशी परंपरा आदिवासींत नाही. नवऱ्याचा छळ आणि सासू सासऱ्यांच्या त्रासात झिजून—झिजून मरण्यापेक्षा त्या नवऱ्याला सोडणे आणि दुसरा जोडीदार (नवरा) निवडणे, पसंतीच्या नवऱ्याबरोबर जीवन जगणे आदिवासी स्त्रीला अधिक पसंत पडते. हया व्यवहाराला आदिवासी समाज मान्यता देतो. बहिष्कार टाकत नाही. याचा अर्थ असा नव्हे की, आदिवासी स्त्रीला दु:ख नाहीच किंवा आदिवासी स्त्री पुर्ण स्वतंत्र आहे.

**आदिवासी स्त्री जीवनाचे वास्तव:—**वास्तवात आदिवासी स्त्रीयांना पुरूषांपेक्षा अधिक कष्ट करावे लागतात. पुरूषांच्या बरोबरीने काम करीत असतानाही त्यांच्या मजुरीचे दर मात्र कमी असतात. उपजीविकेसाठी करावी लागणारी मजुरी, घरकाम मुलांचे संगोपण आणि कुटुंबीयांसाठी करावे लागणारे काम हे सगळे पाहिले तर असे दिसते की, आदिवासी स्त्रीयांची स्थिती गुलाम किंवा वेठबिगार यांच्या सारखीच आहे. त्यांना स्वयंनिर्णयाचा हक्क असतो. समाजात किंवा कुटूंबात त्यांना स्थानही असते. असे असले तरी आदिवासी स्त्रीयांची परंपरेने अशी एक मानसिकता असते की, ती सर्व कामे स्विकारते, त्याविषयी कुठलीही तक्रार करीत नाही. आपल्यावर अन्याय होतो, असेही तिला वाटत नाही. जेव्हा आदिवासी जमातीशिवाय इतर जातीजमातीतील व्यक्तींशी त्यांचा संबंध येतो. त्यावेळी स्वत:संबंधी तटस्थपणे विचार त्या करु शकतील अज्ञान आणि अशिक्षितपणामुळे होणारी फसवणूक आणि काही वेळा त्यांच्यावर होणारा जुलूम जबरदस्ती यासंबंधीची त्यांना जाणिव झाल्याशिवाय राहत नाही. परंतु एकूण परिस्थितीने त्यांना हतबल केलेले असते. लैगिंक शोषणाचा मात्र ती अटीतटीने विरोध करते, जुलूम जबरदस्तीही मान्य करीत नाही. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी व्यवस्थेकडून न मिळू शकलेली सहाय्यता किंवा त्यांच्याकडून घडणारी उपेक्षा यामुळे तिचा बळी जातो. आदिवासी समाजात स्त्रीला माणूस खाणारी डाकीण (चेटकीण) म्हणून दाबले जाते, बिनडोक्याची बडबड करणारी स्त्री म्हणून आदिवासी स्त्रीला पंचायतीत होऊ शकणारा सहभाग नाकारला जातो. हुंडा देऊन आदिवासी स्त्रीला विकत घेतले अशा समाजाखाली स्त्रीला वस्तुप्रमाणे आणि गुलामाप्रमाणे वागविण्यात येते. आदिवासी समाजात एकापेक्षा अधिक बायका करण्याची प्रथा असल्यामुळे आणि हयाच्यातून होणा—या भांडणाला ‘स्त्री विरुध्द स्त्री’ चे स्वरुप देऊन स्त्रीला दडपून टाकण्यात येते. दारु पिऊन आदिवासी स्त्रीला बेदम मारहाणही करण्यात येते. असे आहे आदिवासी स्त्री जीवनाचे वास्तव.

**आदिवासी महिलांचे सबलीकरण:—**दऱ्या खोऱ्यांत, डोंगरात वास्तव्य करणारा आदिवासी समाज परिणामी दारिद्रय, अज्ञान, बेरोजगार, कुपोषण, आरोग्य सुविधांचा अभाव अशा अनेकविध समस्यांनी ग्रस्त आहे. अर्थातच आदिवासी स्त्रीही अशाप्रकारचे दयनिय जीवनमान जगत आहे. दैनंदिन व मुलभूत असणाऱ्या छोटया—मोठया गरजाही त्या पूर्ण करु शकत नाहीत. त्यांना या सर्व परिस्थितीतून बाहेर

काढून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे, स्वावलंबी बनविणे इ. साठी आदिवासी महिलांचे सबलीकरण होणे आवश्यक आहे. आदिवासी स्त्रीयांच्या सबलीकरणासाठी अनेक उपाय केले जात आहेत. ज्यातून या महिलांना साक्षर करणे, आर्थिकदृष्टया स्वयंभू, स्वावलंबी बनविणे, राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेणे, महिला सबलीकरणासंदर्भातील नवीन कायद्यांची निर्मिती व अंमलबजावणी इत्यादी विविध साधनांचा माध्यमांचा उपयोग केला जातो आहे. आर्थिक स्वावलंबन हे प्रत्येक व्यक्तींच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक व महत्वाचे बनले आहे. आदिवासी महिलांच्या सबलीकरणासाठीही त्यांचे आर्थिक स्वावलंबीकरण एक मुख्य प्रभावी साधन आहे.आदिवासी महिला ही काटक, संयमी, समजंस, प्रयत्नांची पराकाष्ठा करणारी असते. तिच्या अंगी जिद्द, चिकाटी व प्रबल आत्मविश्वास आहे. विपरीत परिस्थितीतही संयम व धाडसाने आदिवासी महिला निर्णय घेत असते. चुल—मूल आणि कुटूंबाची सर्व जबाबदारी तसेच शेती व्यवसाय व जोडधंद्याचीही देखभाल करण्याची अचाट शक्ती या आदिवासी महिलांत पहावयास मिळते. अशा या महान व अगाद्य शक्तीरुपी आदिवासी महिलेला जर संधी दिली तर तिच्यातील कला कौशल्य व चिकाटीला सहाय्य केले व समाजातील विविध छोटे—मोठे व्यवसाय उद्योग, गृहउद्योग, स्वयंउद्योग तिला उपलब्ध करुन देवून आर्थिक पाठबळ तिच्या पाठीशी उभे केले तर विकास प्रक्रियेची गती अधिक वाढेल. आदिवासी महिला सक्रीय होईल, त्या संघटीत होतील. त्यातून त्यांच्या व्यवहारकक्षा व ज्ञानकक्षा विस्तार पावतील. त्यांना स्वत:चे प्रश्न स्वत: सोडविण्याची क्षमता प्राप्त होईल. आदिवासी महिला धीट व सबळ होतील.भारताची एकूण लोकसंख्या १,२१,०५,६९,५७३ इतकी आहे. यामध्ये पुरूषांची संख्या ६२,३१,२१,८४३ एवढी तर स्त्रीयांची संख्या ५८,७४,४७,७३० एवढी आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येत आदिवासींची लोकसंख्या १०,४२,८१,०३४ इतकी आहे. पैकी आदिवासी स्त्रीयांची संख्या ५,१८,७१,२११ इतकी आहे. (आकडेवारी २०११ च्या जनगणनेनुसार)महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११,२३,७४,३३३ एवढी आहे. त्यात ५,८२,४३,०५६ पुरूषांची लोकसंख्या तर स्त्रीयांची लोकसंख्या ५,४१,३१,२७७ एवढी आहे. स्त्रीयांच्या एकूण लोकसंख्येपैकी महाराष्ट्रात आदिवासी स्त्रीयांची लोकसंख्या ५१,९५,१८८ इतकी आहे. तर पुरूष आदिवासी लोकसंख्या ५३,१५,०२५ एवढी आहे. अर्थात महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या १,०५,१०,२१३ इतकी असून त्यात अर्धा भाग महिला लोकसंख्येचा आहे.भारतातील एकूण आदिवासी महिलांच्या लोकसंख्येपैकी ४,६६,९२,८२१ आदिवासी महिला हया ग्रामीण भागात डोंगर, दऱ्या खोऱ्यात वास्तव्य करतात. तर ५१,७८,३९० आदिवासी महिला हया शहरी भागात वास्तव्य करतात. महाराष्ट्रातील याबाबतची स्थिती बघता आदिवासी महिलांच्या लोकसंख्येपैकी ४४,६५,६२१ आदिवासी महिला ग्रामीण भागात वास्तव्य करतात. तर ७,२९,५६७ आदिवासी महिला शहरी भागात रहिवासलेल्या आहेत. महाराष्ट्र हे देशातील एकमेव पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. कारण महिलांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी करणे व त्यांना आत्मविश्वासाने वाटचाल करण्यास प्रवृत्त करणे, या उद्दिष्टांसाठी महाराष्ट्र शासनाने १९७५ मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाची (माविम) स्थापना केली. महिलांचे संघटन घडवून आणणे, महिलांच्या क्षमता विकसीत करणे, त्यांचा उद्योजकीय विकास घडवून आणणे रोजगाराच्या संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे, आणि अंतीमत: महिलांचे सक्षमीकरण घडवून आणणे, हे प्रमुख उद्देश डोळयापुढे ठेवून 'माविम' कार्य करते. यात अधिक भर म्हणून महाराष्ट्र शासनाने सन १९९४ साली महिलांसाठी व त्यांच्या सबलीकरण व सक्षमीकरणासाठी महिला धोरण जाहिर केले. याचाच एक भाग म्हणून आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासनानेही आदिवासी महिलांना सक्षम, सुदृढ व निकोप करण्यासाठी, त्या कार्यकुशल, क्रियाशील बनाव्यात, त्यांच्या ज्ञान व कौशल्यातून आणि कठोर परिश्रमातून त्या स्वावलंबी बनाव्यात, त्यांच्याविषयी पुरूषी दृष्टीकोन बदलावा, त्यांच्याकडे समाजाने दुरदृष्टीने पहावे व त्यांना समाजात समानतेने स्थान मिळावे व त्यांच्या शक्तीचा फायदा आदिवासी समाजाच्या विकास प्रक्रियेला लाभावा म्हणून 'आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गट योजना' सन २००४ पासून राबविण्यास सुरुवात केली आहे.**आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गट योजना:**—"परावलंबीत्वाकडून स्वावलंबीत्वाकडे जाण्यासाठी स्वत:च्या इच्छेने एकत्र येऊन सामुहिकपणे आर्थिक बचतीच्या निमित्ताने केलेली वाटचाल, प्रवास म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट होय" आदिवासी महिला मुळातच काटकसर करणाऱ्या असतात. पण त्यांना बचतीची सवय जडावी. त्यांच्यातील कार्यकुशल महिलेला स्वत:चा व्यवसाय आरंभ करण्यासाठी कर्जाऊ पैसे घेण्यापेक्षा गटातील महिलांनी जमा केलेले पैसे तिला मिळावे. सावकाराच्या शोषित कर्जापेक्षा आपले कर्ज योग्य अशी भावना महिलांमध्ये निर्माण व्हावी. महिलांनी एकत्र यावे, अडीअडचणी समजून घ्याव्यात व एक दुसरीच्या निकडीचा, सुख—दु:खाचाही विचार करावा, यासाठी या समविचारी आदिवासी महिला एकत्र येतात. वा त्यांना एकत्र येण्यास प्रोत्साहित केले जाते. आदिवासी महिला बचत गटात १० ते ११ आदिवासी महिला सदस्या असतात. या बचत गटाला नाव दिले जाते. या सर्व आदिवासी महिला समविचारी असल्यामुळे आपापल्या विचारांची आपापसात देवाण—घेवाण करतात. आपापल्या कुवतीनुसार दर महिन्याला ठराविक रक्कम, रुपये जमा करतात दर महिन्याला प्रत्येक महिलेची होणारी बचत रक्कम सहा महिन्यापर्यंत नुसती एकत्र केली जाते. जमा झालेली रक्कम कुणाच्याही घरी न ठेवता गटाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून जमा केली जाते. ज्यातून त्या रकमेवर व्याज मिळेल. ज्या महिलेला पैशाची गरज असेल किंवा तिला व्यवसाय उभारायचा असेल तर तिला वाजवी दराने या खात्यातून रक्कम काढून देण्यात येते. घेतलेले कर्ज रक्कम विहित मुदतीत हफ्त्या—हफ्त्याने परत फेडणे बंधनकारक असते. हे सर्व बचत गटाच्या नियम व अटीनुसार चालते. महाराष्ट्रात महिला आर्थिक विकास महामंडळ (महाराष्ट्र शासन अंगीकृत) व आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्तरित्या प्रयत्नातून महाराष्ट्रातील आदिवासी महिलांच्या सबलीकरण व सक्षमीकरणासाठी आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गट कार्यक्रम

राबविण्याचे कार्य हाती घेण्यात आले. त्या अंतर्गत सुरवातीला ४,६०० आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करण्याचे कार्य राज्यातील ७४ तालुक्यांमध्ये १०५ गावांमध्ये स्थापन करण्याचे कार्य महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपविण्यात आले. सदर कार्यक्रम योजना ठाणे, नाशिक, नंदुरबार, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, अमरावती व यवतमाळ या आदिवासी वास्तव्य करणाऱ्या ८ जिल्हयांमध्ये प्रथम राबविण्यास सन २००४ पासून सुरुवात केली. सदर योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात सन २००७ अखेर पर्यंत २,८३२ स्वयंसहाय्यता बचत गटांची निर्मिती केली गेली. तर सन २००९ पर्यंत उर्वरित १,७६८ एवढया स्वयंसहाय्यता बचत गटांची निर्मिती करण्यात आली. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात एकूण १,५०० स्वयंसहाय्यता बचत गट निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आलेले होते. त्यानुसार सन २००८ ते २०१० या काळात ३,२६८ गट निर्माण करण्यात आले. व त्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध दिले गेले. या बचत गटांच्या कार्यावरती नियंत्रणाची व संचालनाची जबाबदारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पावर सोपविण्यात आलेली आहे. या आदिवासी महिला बचत गटांना स्वयंरोजगार करण्यासाठी प्रत्येक आदिवासी महिला बचत गटाला वार्षिक १०,००० रुपये अर्थसहाय्य देण्यात येते. अशा प्रकारे अटींची, शर्तीची पूर्तता करणाऱ्या प्रत्येक बचत गटाला शेळी– मेंढी पालन, कुक्कुट पालन, बालवाडी–अंगणवाडीचा पोषण आहार शिजविणे, इत्यादी स्वरुपाच्या उद्योग, व्यवसायासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. ज्यातून आदिवासी महिला हया आर्थिक स्वावलंबी बनतील आणि या महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरण घडून येईल.

**निष्कर्ष:–**मनुष्य केवळ दारिद्रय आणि भूक यांचा बळी ठरवण्यासाठी जन्मलेला नाही. प्रत्येक व्यक्तीमध्ये प्रचंड सुक्ष्म क्षमता असते. केवळ एक व्यक्ती आपल्या समाजातील, देशातील वर्तमान व भविष्य काळातील समाजजीवनावर प्रभाव पाडू शकते. तर मग सर्वजण मिळून, संघटीत एखाद्या ध्येयासाठी काम करु लागलो तर दारिद्रयमुक्त जग निश्चित निर्माण होऊ शकते. ही अशी स्फुर्तीदायक वाक्य आहे. बचत गटाचे जनक पर्यायाने मायक्रोफायनान्सचे प्रणेते, नोबेल पुरस्कार विजेते प्रा. महमद युनुन यांनी गरीबांना अल्प रकमेचा पतपुरवठा करुन येणाऱ्या अल्प उत्पन्नातून नियमित हफ्त्याने या कर्जाची परतफेड करण्याची योजना व ती चांगलीच यशस्वी झाली. नव्हे तर जगभर स्विकारली गेली. विशेषत: आदिवासी महिलांच्या सबलीकरणाच्या प्रक्रियेत स्वयंसहाय्यता बचत गटांची भूमिका विशेष प्रभावी ठरते आहे. आदिवासी महिलांचे जीवन जगणे म्हणजे केवळ चुल व मूल एवढयापुरते मर्यादित नाही, तर त्याही पलिकडचे असावे. आपल्या समाजासाठी, गावासाठी विशेषत: आपल्या सहकारी महिला भगिनींसाठी कार्य करण्याची संधी मिळते. संघटीतपणातून नवीन–नवीन शिकण्याची संधी मिळते. बँकेचे व्यवहार समजतात, पोस्टाचे व्यवहार समजतात, महिलांच्या व्यवहार ज्ञानात भर पडते. या आदिवासी महिलांचा व त्यासोबत आपल्या परिवारांचाही सर्वागिण विकास करुन घेण्याची संधी स्वयंसहाय्यता बचत गटांच्या सदस्याच्या निमित्ताने त्यांना मिळते.बचत गट हे स्वावलंबनाचे, मानसिक व वैचारिक, आर्थिक उन्नतीचे आणि सामाजिक प्रगतीचे एक उत्तम माध्यम आहे. बचत गटामुळे आदिवासी महिलांची गतिशिलता वाढते व त्यासोबत आत्मविश्वासही वाढतो. शासकीय यंत्रणेबद्दल आत्मियता वाढते. शासकीय यंत्रणेमधील दुरावा कमी होऊन जवळीक साधता येते. या बचत गटांमुळे आदिवासी महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहून भविष्यामध्ये आपले कुटूंब, गाव, समाज व पर्यायाने देशासाठीही काहीतरी करावे ही जाणिव होते आहे. तसेच त्यांच्यातील कार्यात्मक साक्षरता, संभाषण कौशल्ये, कार्यात्मक कौशल्यांची वाढ होत आहे. अशाप्रकारे आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात सबलीकरणात ‘आदिवासी महिला स्वयंसहाय्यता बचत गट’ कार्यक्रम योजना एक महत्वाची भूमिका बजावित आहे. आदिवासी समाजाच्या विकास कार्यात आदिवासी स्त्रीयांची भूमिका महत्वाची आहे. म्हणून आदिवासी समाजाच्या विकासासाठी आदिवासी महिलांचे आर्थिक, सामाजिक स्वरुपाचे सक्षमीकरण, सबलीकरण घडवून येणे आवश्यक आहे. आणि यासाठी स्वयंसहाय्यता बचत गट हे एक प्रभावी माध्यम आहे, असे म्हणता येईल.

संदर्भ:–

1) ‘भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या’ – डॉ. प्रभाकर मांडे, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
2) संक्षिप्त टिपण्णी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर, ता. अकोले, जि. अहमदनगर, सन २०११.
3) सहकार भारतीचे मुखपत्र, ‘सहकार सुगंध, मासिक जून २०१२.
4) ‘हाकारा’ त्रैमासिक विशेषांक – २००६.
5) ‘Demographic Status of Scheduled Tribe Population of India’- 2011.
6) www.mavim.com
7) दैनिक सकाळ, ०५ जानेवारी २०१२.
8) दैनिक सार्वमत.